सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
आरोग्य विभाग
इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन, सोलापूर,४१३००१.
Email :- mohsolapur@gmail.com


NATIONAL URBAN HEALTH MISSION

जा.क्र./आअ/NUHM/ E-36434 दिनांक: 26/11/2025

## जाहिरात प्रसिद्धीकरण

राष्ट्रीय आरोग्य अभियान ( NUHM), सोलापूर महानगरपालिका अंतर्गत पब्लिक हेल्थ मॅनेजर, क्षयरोग विभाग अंतर्गत असलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ (TB), फार्मासिस्ट (TB), व रा.आ.अ. अंतर्गत क्ष-किरण तंत्रज्ञ ( X-ray Technicians) (UCHC) व क्षयरोग विभाग अंतर्गत वैद्यकीय अधिकारी MBBS (RNTCP) संवर्गातील रिक्त असलेल्या पदांची पदभरती कंत्राटी पद्धतीने करार तत्वावर राबविण्यात येत असून विहित पात्रता व शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या इच्छुक उमेदवारांकडून दिनांक 27/11/2025 ते 05/12/2025 या कालावधीत सोलापूर महानगरपालिका आरोग्य मुख्य कार्यालय येथे विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येतील. सदर पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, संवर्ग, अटी व शर्ती, अर्जाचा विहित नमुना तसेच याबाबतीत विस्तृत सूचना सोलापूर महानगरपालिकेच्या https://www.solapurcorporation.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे सदर जाहिरात स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसारित करणे व सदरचा खर्च "जाहिराती व दौन्ड्या" या लेखाशीर्षामधून करणे याकामी मान्यता देण्यात येत आहे.

(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त-३ (आरोग्य)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
## आरोग्य विभाग
इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन, सोलापूर,४१३००१.
Email :- mohsolapur@gmail.com


NATIONAL URBAN HEALTH MISSION

जा.क्र./आअ/NUHM/1128    E-36434    दिनांक:-2611/2025

-: जाहीरात प्रसिद्धीकरण :-

दि. 27/11/2025 ते दि.0512/2025
(अर्ज स्वीकारण्याची वेळ: सकाळी 10:00 ते सायंकाळी 5:00 वाजेपर्यंत)
स्थळ: आरोग्य विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) ,आरोग्य विभाग सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचेकडे विविध संवर्गातील रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रिया कंत्राटी पद्धतीने करार तत्वावर राबविण्यात येत असून खालील नमूद पदांसाठी शैक्षणिक अर्हता धरण करीत असलेल्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) **पदाचे नाव: पब्लिक हेल्थ मॅनेजर**

शैक्षणिक अर्हता: **MBBS Or Graduate in Health Science (BAMS/ BUMS/ BHMS/ BDS/B.P.Th/Nursing Basic / P.B.B.Sc./ B.Pharm./ + MPH/ MHA/MBA in Health Care Administration)**

वयोमर्यादा : **खुल्या प्रवर्गाकरिता १८ ते ३८ व राखीव प्रवर्गाकरिता १८ ते ४३ वर्षापर्यंत.**

पदाचे मानधन: **र.रु. ३२,०००/- प्रतीमाह.**

अनुभव – i) **Essential:** PHM must have an experience of 2 years in health program management which could be in disease surveillance/ community mobilization/ inter-sectoral collaboration/IEC/BCC activities/ Quality Control. Monitoring & evaluation.

ii) **Desirable :** Knowledge of basic concepts of epidemiology and biostatistics, and understanding of health information system.

| | प्रवर्ग निहाय पदसंख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अ. जाती | अनु. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इ.मा.व. | आ.दु.घ. | सा.शै.मा.प्र. | खुला | एकूण पदसंख्या |
| १ | **0१** | 00 | **0१** | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | **०२** |

2) **पदाचे नाव: प्रयोगशाळा तंत्रज्ञ (TB)**

शैक्षणिक अर्हता: 1. **Intermediate (10+2) and Diploma or Certificate Course in Medical Laboratory Technology or Equivalent And 2. MSCIT.**

**[Preferential 1. Minimum 1 year experience in NTEP or Sputum Smear Microscopy.**

**2. Candidate with higher Qualification (for Example Graduate) will be preferred]**

वयोमर्यादा : **५९ वर्षापर्यंत .** पदाचे मानधन: **र.रु. १७,०००/- प्रतीमाह.**

| | प्रवर्ग निहाय पदसंख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अ. जाती | अनु. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इ.मा.व. | आ.दु.घ. | सा.शै.मा.प्र. | खुला | एकूण पदसंख्या |
| १ | **०१** | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | **०१** |

3) **पदाचे नाव: प्रयोगशाळा तंत्रज्ञ (UPHC)**

शैक्षणिक अर्हता: 1. **Intermediate (10+2) and Diploma or Certificate Course in Medical Laboratory Technology or Equivalent And 2. MSCIT.**

**[Preferential 1. Minimum 1 year experience in all type of laboratory work.**

**2. Candidate with higher Qualification (for Example Graduate) will be preferred]**

वयोमर्यादा : **५९ वर्षापर्यंत .** पदाचे मानधन: **र.रु. १७,०००/- प्रतीमाह.**

| | प्रवर्ग निहाय पदसंख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अ. जाती | अनु. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इ.मा.व. | आ.दु.घ. | सा.शै.मा.प्र. | खुला | एकूण पदसंख्या |
| १ | 00 | **01** | 00 | 00 | **01** | 00 | 00 | 00 | 00 | 00 | **02** |

4) **पदाचे नाव: फार्मासिस्ट (TB)**

शैक्षणिक अर्हता: **Degree or Diploma in Pharmacy from recognized University + MSCIT**

**(1 year experience in maintain drug store in a recognized hospital/ health sector recognized by Govt. Candidate should be well conversant with various computer programming including word, power point, Excel & simplest statistical package)**

वयोमर्यादा : **५९ वर्षापर्यंत .** पदाचे मानधन: **र.रु. १७,०००/- प्रतीमाह.**

| | प्रवर्ग निहाय पदसंख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अ. जाती | अनु. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इ.मा.व. | आ.दु.घ. | सा.शै.मा.प्र. | खुला | एकूण पदसंख्या |
| १ | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | **०१** | **०१** |

**5) पदाचे नाव: क्ष- किरण तंत्रज्ञ ( X-ray Technicians) (UCHC)**

शैक्षणिक अर्हता: **12th + Diploma in Radiographer & X-Ray**

वयोमर्यादा : **५९ वर्षापर्यंत .**

पदाचे मानधन: **र.रु. १७,०००/- प्रतीमाह.**

| अ.क्र. | प्रवर्ग निहाय पदसंख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. जाती | अनु. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | इ.मा.व. | आ.दु.घ. | सा.शै.मा.प्र. | खुला | एकूण पदसंख्या |
| १ | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | **०१** | **०१** |

**शर्ती व अटी :-**

१. वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकवट मानधनाची आहेत.

२. उमेदवारांकडून दिनांक 27/11/2025 ते दिनांक 05/12/2025 या कालावधीत कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून सकाळी १०:०० ते दुपारी ०५:०० या वेळेतच अर्ज स्विकृती करण्यात येईल. अर्ज स्विकृती ही आरोग्य मुख्य कार्यालय, प्रशासकीय इमारत, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर या ठिकाणी करण्यात येईल. उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदाकरिता अर्ज सादर करायचा असल्यास, प्रत्येक पदाकरिता स्वतंत्रपणे अर्ज सादर करावा. परंतू वेळप्रसंगी एकाच वेळी मुलाखत / परिक्षा घेतली गेल्यास कोणत्या तरी एका पदाकरीता उपस्थित रहावे लागेल. ज्यास उपस्थित राहील त्या पदाकरिता संबधित उमेदवार ग्राहय धरला जाईल.

३. पदभरती प्रक्रियेकरिता प्रत्येक अर्जाकरिता अराखीव प्रवर्गातील उमेदवारांकरिता रु.१५०/- (अक्षरी रक्कम रु. एकशे पन्नास फक्त) व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना रु. १००/- (अक्षरी रक्कम रु.शंभर रुपये फक्त) इतके शुल्क आकारण्यात येत असून, सदरील शुल्क हे डिमांड ड्राफट (Demand Draft) स्वरुपात स्विकारण्यात येईल. सदरील शुल्क हे नापरतावा (Non Refundable) असून, उमेदवारांनी डिमांड ड्राफट हे (Integrated Health & Family Welfare Society Solapur) या संपूर्ण नावे असावा आंणि अर्जावर एकदम वरच्या बाजूस जोडण्यात यावा. डिमांड ड्राफ्टच्या मागील बाजूस उमेदवाराने त्यांचे संपूर्ण नाव, अर्ज सादर केलेल्या पदांचे नाव, पद क्रमांक टाकावा, जर डिमांड ड्राफ्ट च्या नावामध्ये चूक आढळल्यास अथवा खराब असल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज पदभरतीच्या पुढील प्रक्रियेकरीता ग्राहय धरला जाणार नाही यांची उमेदवारांनी जाणीवपूर्वक नोंद घेण्यात यावी.

४. वरील सर्व पदे ही कंत्राटी, तात्पुरत्या स्वरूपाची व एकवट मानधनावरील असल्याने, सदर पदाकरीता उमेदवाराचा भविष्यात पदाबाबतचा कायम करण्याचा हक्क व दावा राहणार नाही.

५. सर्व पदाकरीता उमेदवारानी अर्ज सादर करताना त्या पदासाठी आवश्यक असलेली प्रथम विहीत नमुन्यातील अर्जासोबत पुढीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) जातीचा दाखला व लागू असल्यास जात वैधता प्रमाणपत्र

२) वयाचा पुरावा असलेला दाखला (१० वी प्रमाणपत्र/ शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला इ.)

३) वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र

४) नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (इ.मा.व.)/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्याचे चालू वर्षाचे प्रमाणपत्र (आ.दु.घ)

५) १२ वी प्रमाणपत्र

६) पदवीका / पदवीचे अंतिम वर्षाचे गुणपत्रक

७) पदवीका/ पदवी प्रमाणपत्र

८) अतिरिक्त शैक्षणिक अर्हताचे प्रमाणपत्र

९) पदाशी संबधित महाराष्ट्र राज्य परिषदेकडील वैध असलेली नोंदणी (व मुदत संपलेली असल्यास नुतनीकरण प्रमाणपत्र)

१०) MSCIT प्रमाणपत्र

११) पदाशी संबधित महाराष्ट्र राज्य परिषदेकडील नोंदणी झाल्यानंतरच्या कालावधीतील त्याच पदाशी निगडीत असलेल्या कामकाजाच्या अनुभवाचे वैध दाखले. ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत साक्षांकित स्वसाक्षांकित करून जोडावीत. ज्या प्रमाणपत्रामध्ये Grading System नुसार मार्क असतील त्यांनी संबंधित प्रमाणपत्रामागील Grade Card झेरॉक्स अर्जासोबत जोडण्यात यावी (विशेषत: CGPA/SGPA), अर्जासह जोडलेल्या सर्व कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक टाकण्यात यावेत. CGPA/SGPA याचे टक्केवारीमध्ये परिवर्तन करावयाचे संबंधित विद्यापीठाचे अधिकृत Conversion Table सोबत जोडण्यात यावे. तसे जोडलेले नसल्यास सदरचा उमेदवारी अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरीता अर्जाच्या वरील पृष्टभागाची झेरॉक्स घेऊन येणे.

६. उमेदवारांची अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार असलेल्या प्रवर्ग आणि बँकेचे नाव व डिमांड ड्राफ्ट क्रमांक अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावे.

७. . उपरोक्त पदभरतीबाबत असलेल्या सर्व सुचना (तात्पुरते पात्र / अपात्र, हरकती स्विकारणे, अंतिम पात्र / अपात्र, मुलाखती किंवा लेखी परिक्षेस निवड झालेल्यांची यादी, मुलाखत अथवा लेखी परिक्षा वेळापत्रक व इतर बाबी) हया सोलापूर महानगरपालिका, सोलापुर चे अधिकृत संकेतस्थळ http://www.solapurcorporation.gov.in वर प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत उमेदवारांस कोणतेही सुचना दूरध्वनी निरोप, SMS, Email केला जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहील.

८. सदर रिक्त पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा,सामाजिक आरक्षण, नियुक्ती ठीकाणामध्ये बदल, नमूद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन पदभरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान पदभरती निवड समिती सोलापूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

९. आवश्यक त्या संख्येमध्ये राखीव प्रवर्गाचे उमेदवार आवश्यक प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास, सदर रिक्त पदांच्या पदभरतीची आवश्यकता लक्षात घेता अराखीव प्रवर्गातील प्रतिक्षाधीन उमेदवारास राखीव प्रवर्गाकरीता तात्पुरत्या स्वरुपामध्ये नियुक्ती देण्यात येईल.(सदरची अट ही ज्या पदाकरिता खुला प्रवर्गाच्या जागा आहेत तिथेच लागू राहिल)

१०. राखीव प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

११. ठराविक प्रमाणपत्र सादरीकरण करणेकामी सेतू कार्यालयाकडील पावती अर्जासोबत सादर केलेली असल्यास, सदरील उमेदबारांचे अर्ज तात्पुरत्या पात्र / अपात्र यादीमध्ये अपात्र ठरविण्यात येतील. परंतू उमेदवारांनी हरकती वेळेस सदरील सेतु कार्यालयाकडील प्रमाणपत्र सादर केल्यास संबधित उमेदवारांचे अर्ज अंतिम पात्र / अपात्र यादी मध्ये पात्र ठरविण्यात येतील.

१२. अर्जाचा नमूना हा सोलापूर महानगरपालिका च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून सदरील अर्जाचा नमुना मध्ये अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज स्विकारला जाणार नाही.यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. (स्वतः टंकलिखित केलेले, नमुन्यामध्ये बदल असल्यास अथवा इतर अर्ज विक्री केंद्राच्या नावानुसार असलेले अर्जस्विकारले जाणार नाहीत यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.)

१३. उमेदवार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. तसेच उमेदवारांविरूध्द कोणत्याही स्वरूपाचा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

१४. केंद्र सरकार अथवा राज्य शासनाकडून संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवारांस कोणतीही पुर्व सुचना न देता संबंधित उमेदवारांची सेवा संपुष्टात आणण्यात येईल. यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक असणार नाही.

१५. उमेदवाराने अर्ज सादर केलेल्या संबंधित पदांशी निगडीत अनुभव आवश्यक आहे. अनुभव प्रमाणपत्र न जोडलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्र जोडलेले अनुभव ग्राहय धरण्यात येऊन त्याबाबतचे गुण देण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. तथापि उमेदवारांनी अर्जासोबत अनुभव दाखला जोडले नसल्यास त्यांचे गुण देण्यात येणार नाही अथवा नंतर सादर केल्यास ती स्वीकारली जाणार नाही.

१६. वैद्यकीय अधिकारी व्यतिरिक्त अन्य पदाच्या निवडीकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

| अ.क्र. | विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १ | पदासाठी आवश्यक qualifying exam मधील गुण (**अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे**) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० टक्के प्रमाणे Proportion काढावे. (उदा. : ६० % गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % Proportion = ६० X ५०/१०० = ३०) | ५० |
| २ | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (**पदाशी संबंधित विषयामध्येच असल्यास विचारात घ्यावी**) | अतिरिक्त शैक्षणिक अर्हताच्या मिळालेल्या गुणाच्या टक्केवारीचे २० % प्रमाणे Proportion काढावे. (उदा.स्टाफ नर्स करिता आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc. Nursing च्या अंतिम वर्षात ६० % गुण प्राप्त असल्यास त्याचे २० % Proportion = ६० X २०/१०० = १२). | २० |
| 3 | संबंधित पदाशी निगडीत (**परिषदेकडील नोंदणी झाल्यानंतरच्या कालावधीतील**) अनुभव | प्रत्येक वर्षाकरिता ६ गुण द्यावेत. एका वर्षाकरिता ०६ गुण असून जास्तीत जास्त ३० गुण. | ३० |
| | | एकूण | १०० |

१७. उमेदवारांनी वर नमूद केलेल्या कालावधीमध्ये कार्यालयीन दिवशी व वेळेत अर्ज सादर करण्यात यावेत. नमूद मुदतीत आलेल्या अर्जाचा विचार केला जाईल. याबाबत उमेदवारांकडून कोणत्या स्वरूपाची तक्रार अथवा त्रयस्थामार्फत दबाव तंत्राचा वापर करण्याचा प्रयत्न करू नये.

१८. मा.शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुटुंबाची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवाराने सादर करावयाचे आहे.

(**आशिष सुमन सुधाकरराव लोकरे**)
**उपायुक्त (आरोग्य)**,
**सोलापूर** महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

### आरोग्य विभाग, सो.म.पा. भरती 2025-26

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक :-**

| अलीकडील रंगीत छायाचित्र |
|---|

**प्रति,**
मा.आयुक्त तथा अध्यक्ष,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, पदभरती निवड समिती
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

**पदाचे नाव :-** ________________ **पद क्र. ------------या पदाकरीता अर्ज.**

**बँकेच नाव :-** ________________ **डी.डी. क्रमांक:---------डी.डी. रक्कम रु.------/-**

१. **उमेदवारांचे संपूर्ण नाव :-** ________________

२. **उमेदवारांचे बदल असलेले नाव :-** ________________

३. **उमेदवारांचे वडील / पती यांचे संपूर्ण नाव :-** ________________

४. **उमेदवारांची जन्म तारीख दि.** 15/11/2025 **रोजीचे :- दिवस --------- महिना ---------- वर्ष---------**

**अक्षरी जन्म तारीख :-** ________________

________________

५. **उमेदवाराचा पत्ता :-** ________________

________________

________________

________________

**मोबाईल क्रमांक :-** ________________

(नमुद करणे अनिवार्य)

६. **अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र :- आहे / नाही** (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

७. **अर्जदारकडे जातीचे प्रमाणपत्र :- आहे / नाही** (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

**जातीचा प्रवर्ग :-** ________________ **जातीचे नाव :-** ________________

**अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :-** ________________

(नमुद करणे अनिवार्य)

८. अर्जदाराची वैवाहिक परिस्थिती :- विवाहीत / अविवाहीत (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

अर्जदाराकरीता टिप :- अर्ज कार्यालयास जमा केल्याची पोहोच पहिजे असल्यास, सदरील पानावरील संपूर्ण माहिती भरुन झेरॉक्स काढून घेऊन येणे.

९. पदवी (Degree):-

| धारण केलेली पदवी | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०. पदव्युत्तर पदविका (Diploma) :-

| धारण केलेली पदव्युत्तर पदविका | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

११. पदव्युत्तर पदवी ( Post Graduation) :-

| धारण केलेली पदव्युत्तर पदवी | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२. इतर शैक्षणिक अर्हता :-

| अभ्यासक्रम / कोर्स | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| MSCIT | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३.अनुभव

| अ.क्र. | कार्यालयांचे नाव | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**१४. अर्जसोबत खालील प्रती सांक्षाकित करुन जोडलेल्या आहेत.**

१. ------------------------------------------ ६. ------------------------------------------

२. ------------------------------------------ ७.------------------------------------------

------------------------------------------ ८.------------------------------------------

४. ------------------------------------------ ९.------------------------------------------

५. ------------------------------------------ १०.------------------------------------------

१५. वरील नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदाकीरता विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की वर दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहिल व त्याबाबतची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीतील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन त्या मला मान्य आहेत.

**ठिकाण :- सोलापूर** **अर्जदार स्वाक्षरी :-** --------------------------

**दिनांक :-** / /2025 **अर्जदाराचे नाव :-** --------------------------

=============================================================

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम , २००५ मधील**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना अ**

( नियम ४ पहा )

मी श्री/श्रीमती/ कुमारी ____________________

श्री ____________________

यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी ,

वय - ------- वर्ष राहणार- ____________________

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१) मी ____________________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ---------- (संख्या) इतकी ह्यात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे.

(असल्यास,जन्मदिनांक नमूद करावा)

| अ.नं. | अपत्याचे नाव | जन्मदिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

३) ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण- सही

दिनांक- (श्री/श्रीमती------------------------------------)